नि.फौ.ख.क्रं.४६/२०२६
**सरकार वि. पंकज वगैरे**
**नि.क्र. ०८**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०१ यांची जबानी.**

मी ईश्वराला स्मरून शपथ घेतो की, मी जे काही सांगेन ते खरे सांगेन, संपुर्ण खरे सांगेन आणि खऱ्याशिवाय काहीही सांगणार नाही –

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | : | राजेश्वर मुरलीधर भूरे, |
| वय सुमारे | : | ५६ वर्ष, व्यवसाय– शेती |
| निवासस्थान | : | आकोट, |
| तालुका | : | पवनी, जिल्हा: भंडारा. |

**सरतपास – सहा. सरकारी वकील एन. के. गजभिये मॅडम यांच्यामार्फत–**

**१.** घटना दिनांक ११/११/२०२५ रोजी घडली होती. मी माझी हार्वेस्टर मशीन चेतन डोंगरे याच्या शेतात ठेवली होती. दिनांक ११/११/२०२५ रोजी सकाळी ०८:०० वाजताच्या दरम्यान मी, माझे ड्रायव्हर विलास आकरे आणि दिलीप भूरे हार्वेस्टर जवळ गेलो असता तिथे चिखलात आम्हाला डिझेल तरंगताना आढळून आले. त्यानंतर हार्वेस्टर मशीन आम्ही तपासली असता त्यामध्ये डिझेल नव्हते. हार्वेस्टर मशील मधील १०० लिटर डिझेल चोरी गेले होते. त्यानंतर आम्ही चौकशी केली परंतु काहीही आढळून आले नाही. त्यानंतर मी माझा मित्र सुरेश काटेखाये याला फोन केला. त्याने देखील त्याचे डिझेल चोरी गेले असल्याचे मला सांगितले. सुरेशने मला सांगितले की, प्रकाश गिऱ्हेपुंजे नावाच्या व्यक्तीचे सुध्दा डिझेल चोरी गेले. त्यानंतर दुसऱ्या दिवशी पोलीस स्टेशन अडयाळ येथे मी रिपोर्ट देण्याकरीता गेलो. आता मला मी दिलेली तोंडी रिपोर्ट दाखवण्यात आली. ती तीच आहे. त्यावर माझी सही असून त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्रमांक ०९** देण्यात येते. आता मला छापील प्रथम खबर अहवाल दाखवण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्रमांक १०** देण्यात येते. पोलीसांनी माझे बयान घेतले होते.

**सरतपास पुर्ण.**

**उलट तपास आरोपी क्रमांक १ आणि २ तर्फे वकील डी.एल.देशमुख साहेब यांच्यामार्फत –**

**२.** मी डिझेल पंपावरून डिझेल आणले होते. चोरी गेलेल्या डिझेलचे बील पोलीसांना मी दिले होते. माझ्या हार्वेस्टर मशीन मधील डिझेल कोणी चोरले हे मला माहिति नाही. चोरीची घटना मी प्रत्यक्ष बघितली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्रमांक १ आणि २ यांनी माझ्या हार्वेस्टर मशील मधील

डिझेल चोरले नाही. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी मला सांगितले होते की, आरोपी क्रमांक १ आणि २ यांनी माझ्या हार्वेस्टर मशीन मधील डिझेल चोरले. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांच्या सांगण्यावरून मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास – काही नाही.**

**<u>आरोपी क्रमांक ३ गैरहजर. वकील गैरहजर. करीता उलटतपास नाही.</u>**

समक्ष

स्वा/–
**(व्ही. आर. फरकुंडे)**
न्यायदंडाधिकारी, प्र. श्रे. (न्या.क्र.२),
पवनी.
०३/०७/२०२६

श्रवणोत्तर स्विकृत

स्वा/–
**(व्ही. आर. फरकुंडे)**
न्यायदंडाधिकारी, प्र. श्रे., (न्या.क्र.२)
पवनी.
०३/०७/२०२६